सं.फौ.ख.क्र.१८४१/२०२१
शासन वि. निलेश रमेश बुंदेले
नि.क्र.१२
**CNR :NO:MHBU06-003160-2021**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : रमेश रामभाऊ भामोदकर ,

वय : ५५ वर्ष,

व्यवसाय : पोलीस उपनिरीक्षक शेगाव शहर पोलीस ठाणा ,

राहणार : शेगाव शहर, शेगाव शहर,
जिल्हा- बुलढाणा.

सरतपास:

सरतपास, सरकार तर्फे सरकारी वकील, श्री .एन.जी हिंगणे यांच्यातर्फे सुरू:

दिनांक.३०.०६.२०२१ रोजी मी, खामगाव शहर पोलीस ठाणे नेमणुकीस होतो. त्यादिवशी माझी ड्युटी भीमराव ब्राह्मणे यांच्यासोबत होती. मी व इतर पोलीस कर्मचारी येथे आलो. आम्ही E. C.Act चे केसेस करण्यासाठी आलो होतो. आम्ही तुरा चार्ट सेंटर येथे आलो असता आम्हाला दिसले की त्याच्यात सेंटरवर घरगुती गॅसचा वापर व्यवसाय साठी येत आहे. तिथे लाल रंगाचा गॅस सिलेंडर दिसून आला आला होता. ती गॅस शेगडीला लावलेली होती व व्यवसाय करीत होते.निलेश रमेश बुंदेले यांच्याकडून ब्राह्मणे यांनी गॅस सिलेंड पंचनामा करून जप्त केला .पोलीस उपनिरीक्षक ब्राह्मणे यांनी पोलीस ठाण्यात परत येऊन गुन्हा दाखल केला.निलेश रमेश बुंदेले यांनाही

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH Date: 2026.03.23 16:21:36 +0530

पोलीस ठाण्यात घेऊन गेले होते. आज रोजी निलेश रमेश बुंदेले न्यायालयात हजर आहे. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी करून माझा आप नोंद केला होता .

सरकारी वकिलांतर्फे सरतपास पूर्ण:

उलटतपास आरोपी तर्फे श्री .वाधवाणी डी.आर. वकिलांतर्फे:

२. घटनेच्या दिवशी माझा जबाब नोंद करण्यात आला होता. जबाब घेतल्यानंतर, तो जबाब मी, वाचून पाहिला होता. आता मला माझा जबाब दाखविण्यात आला, त्यावर दिनांक ०१.०७.२०२१ असे नमूद केलेले आहे. आम्ही दुपारी २.०० ते २.३० च्या दरम्यान गेलो होतो. हे म्हणणे बरोबर आहे की, पोलीस ठाण्यातून कोणत्याही कामानिमित्त गेले असता, त्याबाबतची नोंद स्टेशन डायरी मध्ये करणे आवश्यक असते. आम्ही या बाबत छापा करिता जात असल्याबाबत स्टेशन डायरी मध्ये नोंद केली होती .

३. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडली नव्हती. फिर्याद देता वेळेस आम्ही सर्वजण सोबत होतो. फिर्यादीने फिर्याद टाईप करून लेखी स्वरूपात दिली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, घटनास्थळ वरून नॅशनल हायवे गेलेला आहे आणि त्यामुळे तिथे लोकांची रहदारी असते. हे म्हणणे बरोबर आहे की, घटनास्थळच्या

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by
FARHANA
TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.23
16:21:44 +0530

सं.फौ.ख.क्र.१८४१/२०२१
शासन वि. निलेश रमेश बुंदेले
नि.क्र.१२
**CNR :NO:MHBU06-003160-2021**

समोर एक मोठे कॉम्प्लेक्स आणि दुकाने आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, घटनास्थळापासून १५० फूट अंतरावर खामगाव शहर पोलीस ठाणे आहे .हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्याच्या दुकानावर घरगुती वापरता गॅस सिलेंडर चा वापर व्यवसायासाठी केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वरिष्ठांनी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी ही आज रोजी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष दिली .

उलटतपास पूर्ण:
फेरतपास नाही: श्रवणोत्तर स्वीकृत
दि.२३/०३/२०२६

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.23 16:21:50 +0530

**(एफ.टी.शेख)**
सह. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खामगांव, जिल्हा- बुलढाणा.